

# आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास



संपादक
डॉ. शशिकांत साळवे





श्री. पंढरीनाथ कला, वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, पोखरी
ता. आंबेगाव, जि. पुणे.

ISBN : 978-93-84309-36-7
शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * आदिवासी हेच मूळ निवासी | – प्रा. अशोक खंडू मोरमारे | ९ |
| * आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती | – प्रा.डॉ. माहेश्वरी गावित | १७ |
| * आदिवासी साहित्य संकल्पना, स्वरूप व व्याप्ती | – भागवत बाबासाहेब देशमुख | २६ |
| * आदिवासी साहित्य : प्रेरणा, स्वरूप, व्याप्ती | – डॉ. गोविंद गायकी | ३४ |
| * आदिवासी साहित्य स्वरुप व प्रेरणा | – नेटके राजेश अविनाश | ४५ |
| * मराठीतील साहित्य प्रवाह: आदिवासी साहित्य | – डॉ. रवींद्र रामचंद्र शिंदे | ५१ |
| * आदिवासी समाजाची स्थिती आणि गती | – प्रा.डॉ. कृष्णा भवारी | ५७ |
| * आदिवासी समाजाची स्थितीगती | – प्रा. डॉ. समिंदर मधुकर घोक्षे | ७० |
| * आदिवासी समाजाची स्थितीगती | – प्रा. नामदेव बांगर | ७८ |
| * आदिवासी साहित्य आणि समाजजीवन | – सौ. मोहिते सुलभा शिवाजीराव | ८३ |
| * आदिवासी साहित्य आणि समाजजीवन | – निकिता अनिल शेंडगे | ९२ |
| * आदिवासींचे समाजजीवन | – प्रा. विक्रम ओतारी | ९८ |
| * आदिवासी साहित्य समाज आणि कलाविष्कार | – प्रा. लक्ष्मण धावारे | १०२ |
| * आदिवासी साहित्य आणि कलाविष्कार | – प्रा. चिंतामण धिंदळे | १०७ |
| * आदिवासी समाज व त्यांचा धर्म | – प्रा. राजू शंकर शनवार | ११९ |
| * आदिवासींचे जीवनविश्व | – डॉ.विठ्ठल केदारी | १२५ |





| | | |
|---|---|---|
| * आदिवासी साहित्य आणि स्त्रीजीवन | – प्रा. गोविंद मुंढे | १३३ |
| * आदिवासी आणि मानव स्वभाव | – शकील जाफरी | १३८ |
| * आदिवासी साहित्य : समाज, संस्कृती आणि विकास | – प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ | १४६ |
| * आदिवासी लोकसंस्कृती स्वरूप विकास आणि समस्या | – डॉ. शशिकांत साळवे | १५४ |
| * आदिवासी समाज : रूढी, परंपरा आणि प्रथा | – प्रा. महादेव काळूराम रोकडे | १५८ |
| * आदिवासी साहित्य, संस्कृती व लोककला | – प्रा.डॉ. अनिल गर्जे | १७० |
| * आदिवासी समाज रूढी परंपरा आणि प्रथा | – मनोहर दुलाजी मोहरे | १८३ |
| * आदिवासी ठाकर लोकगीतातून व्यक्त होणारे सामाजिके – सांस्कृतिक जीवन | – प्रा. सुनिलदत्त गोडसे | १९३ |
| * आदिवासी समाज आणि बोली | – मंगेश पंढरीनाथ जोर्वेकर | १९८ |
| * आदिवासी ठाकर बोली | – प्रा.डॉ. सुनिल घनकुटे | २०४ |
| * आदिवासी नृत्यकला | – प्रा.रूपाली कांबळे | २१५ |
| * डांगाणातील आदिवासी महादेव कोळी यांचे सण उत्सव आणि लोकविधी | – प्रा. श्री. यशवंत भांडकोळी | २२२ |
| * आदिवासींचा वाघया देव | – डॉ.अंजली मस्करेन्हस | २४२ |
| * आदिवासींचे वीर | – प्रा.डॉ.शिखरे गोकुळ | २४९ |
| * "आदिवासी मावची समाजातील देवदेवता : एक अभ्यास" | – गावित लता कथ्थु | २५६ |
| * आदिवासींची दैवते | – प्रा. संतोष मारुती शिंदे | २७० |
| * मराठी साहित्यात आदिवासी कथेचे योगदान | – प्रा.आहेर एकनाथ पंडित | २७४ |
| * नव्वदोत्तर मराठी आदिवासी कथा | – डॉ. संजय लोहकरे | २८३ |




Scanned with CamScanner

५) गारे गोविंद, पाहा, तत्रैव, पृ. क्र. ७३ साहित्य : भूमिका आणि स्वरुप, अंतर्भूत, पाहा, तत्रैव, पृ. क्र. ७३ मराठी साहित्य : 'स्वरुप आणि समस्या' संपा. मुनघाटे प्रमोद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ३० जाने. २००७, पृ.क्र.२४



561

# आदिवासी समाजाची स्थिती आणि गती

प्रा.डॉ. कृष्णा भवारी

'आदि' आणि 'वासी' या दोन शब्दापासून 'आदिवासी' हा सामासिक शब्द बनलेला आहे. 'आदि' म्हणजे प्रथम, सुरूवातीपासून आणि 'वासी' म्हणजे वास्तव्य करणारा, वस्ती करणारा. या अर्थाने आदिवासी म्हणजे देशात अगदी प्रथम वस्ती करून राहिलेले लोक असे म्हटले जाते. आजपर्यंत अनेक समाजशास्त्रज्ञांनी व भाषा तज्ज्ञांनी 'आदिवासी' शब्दाची विविधांगाने संकल्पना स्पष्ट केली आहे. आदिवासी समाज हा केवळ भारतातच आहे असे नव्हे तर जगातील अनेक राष्ट्रांमध्ये हा समाज वास्तव्य करून आहे. विशेषत: द.अफ्रिका, अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यांसारख्या प्रगत राष्ट्रांमध्येही आदिवासी समाज विपुल प्रमाणात आहे.

भारतात आदिवासी या शब्दाचा वापर सर्वप्रथम १९३०च्या दशकात थोर आदिवासी नेते दिवंगत राजपालसिंह यांनी छोटा नागपूरमध्ये प्रचालात आणला. ते भारताच्या घटना समितीचे सदस्य होते. त्याचबरोबर ते ऑक्सफर्ड विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतलेले द्रष्टे आदिवासी नेते होते. झारखंड चळवळीचे प्रमुख शिल्पकार म्हणूनही त्यांना ओळखले जाते. भारतामध्ये ईशान्य भागात त्याचप्रमाणे ओरिसा, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये आदिवासी समाज मोठ्या

प्रमाणात आढळतो. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केल्यास चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ, नागपूर, नांदेड, धुळे, नंदुरबार आणि सह्याद्रीची पर्वतरांग या भागांमध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे.२०११ च्या जनगणनेत महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के आदिवासी समाज आहे. यावरून आदिवासी समाजाची व्याप्ती आपल्या लक्षात येते. भारतात एकूण ४५९ आदिवासी जमाती असून महाराष्ट्रात त्यापैकी ४५ जमाती अस्तित्वात आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिकदृष्ट्या तीन गटांत वर्गीकरण केले आहे.

१. सह्याद्री विभाग – महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी.
२. सातपुडा विभाग– भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा, धनका.
३. गोंडवन विभाग– गोंड, माडिया, मुरिआ, परधान, कोरकू, कोलाम, आंध, हलबा.

आदिवासी संस्कृतीचा इतिहास फार प्राचीन आहे. भारतात सर्वात प्रथम आदिवासी संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न ब्रिटिश राजवटीत सुरू झाला. आदिवासींना न्याय मिळावा म्हणून १९ व्या शतकात इंग्रजांनी स्वतंत्र कायदे केले. परंतु भारतातील काही उच्चवर्णीय आणि स्वार्थी लोकांनी त्यांचा अव्हेर केला. त्यामुळे आदिवासी हे मागासलेलेच राहिले. त्यांनी जंगलाचा आश्रय घेतला. रानावनात राहून, कंदमुळे खाऊन काही प्रमाणात शेती व पशूपालन करून आपली उपजिविका करू लागले. पुढे डॉ. बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नामुळे आदिवासी समाजाचे चित्र बदलत गेले. १९५४ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील 'वडसा' येथील भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आदिवासी जमातींमध्ये आरोग्य, राजकारण, आणि समाजकारणाविषयी अदयापही जागृती नसल्याची खंत व्यक्त केली. ते म्हणाले, 'अजूनही आदिवासी समाज रानटी युगातच आहे. त्यांच्या जीवनात कुठल्याही प्रकारचा बदल स्वातंत्र्यायाने घडून आलेला नाही.' यावरून स्वातत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर आदिवासी समाजात काय स्थित्यंतरे झाली



याचे विवेचन या शोधनिबंधात करण्यात आलेला आहे. सदरच्या शोधनिबंधात आदिवासींची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक व राजकीय स्थिती या मुद्यांच्या अनुषंगाने विवेचन करण्याल आले आहे.

### १.आर्थिक स्थिती–

आदिवासी समाज हा प्रामुख्याने अल्पसंतुष्ट आहे. संपत्तीचे संचयन करून ठेवणे त्यांना योग्य वाटत नाही. आपल्या मुलमूत गरजा पूर्ण करण्यासाठी तो सतत कष्ट करत असतो. त्यासाठी तो निसर्गाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतो. निसर्ग हाच त्यांचा दाता असतो. डोंगरदऱ्यात कुठेतरी शेती करून तो आपली उपजिविका करत असतो. त्यासाठी तो आधुनिक तंत्राचा वापर करत नाही तर पारंपरिक शेती करण्याचा प्रयत्न करतो. काही आदिवासी जमाती 'स्थलांतरित' शेती करतात. ईशान्य भागात यालाच 'झूम शेती' असे म्हणतात. शेतीपासून आदिवासींची प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली दिसत नाही. कारण आदिवासींची शेती ही प्रामुख्याने डोंगराळ भागात असल्याने तेथे तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मर्यादा पडते. म्हणून शिकार आणि मासेमारी हा आदिवासींचा मुख्य व्यवसाय बनला आहे. त्याचबरोबर पशुपालन करणे आणि दुग्धजन्य पदार्थापासून त्यांना काहीप्रमाणात आर्थिक मदत होत आहे. तसेच जनावरांचे मांस, कातडी यांपासूनही त्यांना आर्थिक मदत होते. काही आदिवासी समाज हा हस्तव्यवसायातून आपला उदरनिर्वाह करत असतो. तसेच मजुरी, वेठबिगारी यांच्या माध्यमातूनही आदिवासींची आर्थिक समस्या काहीप्रमाणात सुटली आहे. ज्यांची स्वतःच्या मालकीची जमीन नसते, पाळीव प्राणी नसतात असे लोक मजुरी व वेठबिगारीची मार्ग अवलंबतात.

इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाच्या वाट्याला आर्थिक स्त्रोत खूपच कमी असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा हा खालावलेला दिसतो. शासनाने अनेक प्रकारच्या योजना राबविल्या असल्या तरी त्यातील काही जाचक अटींमुळे जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आदिवासी आहेत ते वंचित राहिले आहेत. तसेच शिकारीवर आलेले निर्बंध हे त्यांच्या उदरनिर्वाहात अडथळा निर्माण करतात. आदिवासी भागांमध्ये आजपर्यंत अनेक धरणे आणि कालवे झालेले असताना त्यांना मासेमारी करणे हा

आर्थिक स्त्रोत होऊ शकला असता परंतु शासनाची ठेकेदारी पद्धत आणि मासेमारीची आधुनिक साधने आदिवासींना परवडणारी नसल्यामुळे त्यांना मासेमारी करता येत नाही. पर्यायाने त्यांना कंदमुळे, हिरडा, बेहडा, मोहाची फुले, मध, मेण, डिंक या निसर्गातील घटकांचा वापर करून आपली उपजिविका करावी लागते.

**२.सामाजिक स्थिती–**

आदिवासी समाज हा सुशिक्षित नसल्यामुळे तो संघटित नाही. शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्यामुळे त्यांच्या विकासावर परिणाम होत आहे. रानावनात राहत असल्यामुळे आपल्या आजुबाजूच्या प्रदेशात काय चालले आहे याची त्याला कल्पनाच नसते. आदिवासी समाज हा बुजरा व भित्रा असल्यामुळे तो आपल्या प्रतिष्ठेला जास्त जपतो. अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्याची त्याची वृत्ती नसते. अलीकडे शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या काही आदिवासींना याची जाणीव होऊ लागली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये आदिवासींना ७ टक्के आरक्षण दिले असले तरी त्याचा फायदा त्यांना होतोच असे नाही. कारण नोकऱ्यांच्या आणि सवलतींच्या हव्यासापोटी आज कितीतरी बोगस जात प्रमाणपत्रांच्या आधारे खऱ्या आदिवासींवर अन्याय झाला आहे. आदिवासी समाज हा मुळात आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे शैक्षणिक सुविधांपासून तो वंचित आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयांमध्ये उच्च पदावर आदिवासींचे उमेदवार उपलब्ध होत नाहीत. नोकरीच्या अभिलाषेपोटी इतर समाज आदिवासींमध्ये घुसखोरी करू पाहतात. लैंगिक अत्याचार, कुपोषण, दारिद्र्य, वनवासीकरण या समस्या तर आदिवासी समाजीची पाठ सोडत नाहीत.

अज्ञान आणि अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेला आदिवासी समाज २१ व्या शतकातही फारसा बदलेला नाही. रूढी, परंपरा जपणाऱ्या या समाजाने आधुनिकतेची कास धरलेली नाही. हा समाज सण, समारंभ तितक्याच निष्ठेने साजरे करून जीवनाचा आनंद घेताना दिसतो. या सण–समारंभाचे नाते त्याच्या व्यवसायाशी व संस्कृतीशी जडलेले असते. आदिवासींचे राहणीमान हे अत्यंत साधे असते. त्यांच्या घरांची रचना, पोषाख, आहार आणि सण–उत्सव साजरे करण्याची पद्धत ही प्रत्येक जमातीनिहाय आणि भूप्रदेशानुसार भिन्न असते. आदिवासींच्या पोषाखाचा विचार केला असता पुरूष मंडळी अंगात बंडी, लंगोटी, पागोटे तर स्त्रिया साडी, चोळी, फडकी यांचा वापर करतात. निसर्गातील वस्तुंचा वापर करून या स्त्रिया नटत असतात. सोन्या–चांदीचे दागिने त्यांच्या अंगावर अपवादानेच असतात. त्याऐवजी ते धातुचे अलंकार घालतात.

आदिवासींना मूळ धर्म नाही. तो निसर्ग हाच धर्म मानतो किंवा 'आदिम'हाच धर्म मानतो. परंतु ब्रिटिश राजवटीत ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी भारतातील आदिवासींचे धर्मांतर मोठ्या प्रमाणात घडवून आणले. ईशान्य भागातील नागा, मिझो, गारो, बिरहोर, खारिया, उरोंव व मुंडा या जमातीतील लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे. त्याचबरोबर हिंदू धर्म प्रसारकांनी हिंदू धर्म स्वीकारण्यास भाग पाडला आहे. त्यामुळे मूळचे आदिवासी हे दुसऱ्या धर्माचे अनुयायी बनले व धर्माचरणाचा स्वीकार करू लागले. पर्यायाने आदिवासी समाज हा विभागला आणि त्यांच्यात ऐक्याची भावना राहिली नाही. त्याचा विपरित परिणाम समाज विकासावर मोठयाप्रमाणावर झाल्याचे दिसून येते.

**३.शैक्षणिक स्थिती–**

आदिवासी समाज हा डोंगरदऱ्यात राहत असल्यामुळे शाळेचे ठिकाण त्यांच्यापासून कोसो दूर असते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थी शाळेत जाण्यास उदासिन असतो. त्याचबरोबर अत्यंत दुर्गम भाग असल्यामुळे शिक्षकही या ठिकाणी काम करण्यास तयार नसतात. म्हणून आदिवासी मुले सर्वात जास्त शालाबाह्य असल्याचे दिसून येते. पालकही अशिक्षित असल्यामुळे आपल्या पाल्याने शाळा शिकण्यापेक्षा आपल्याला रोजगारात मदत करावी अशी त्याची इच्छा असते. म्हणून आदिवासींची शैक्षणिक स्थिती आजही म्हणावी अशी सुधारलेली नाही. काही आदिवासींची बोली ही शिक्षणात अडथळा येत असल्यामुळे पारंपरिक शिक्षणपद्धती या मुलांना अवघड जात आहे. मराठी प्रमाणभाषा आदिवासी विद्यार्थ्यांच्या पचनी पडत नाही त्यामुळे शिक्षणात त्यांना रस नाही. अलीकडे राज्यशासनाने गोंड, भिल्ल, पावरा यांच्या बोलींचे

शब्दकोश तयार केले आहेत. त्याद्वारे त्यांच्या बोलीत अभ्यासक्रम तयार करण्यास शासन विचाराधीन आहे. असे असले तरी भविष्यात या विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचणी निर्माण होऊ शकतात.

आदिवासींच्या शिक्षणासाठी शासनाने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. उदा. मोफत सायकल पुरविणे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींना शैक्षणिक भत्ता, गणवेश व शैक्षणिक साहित्य मोफत देणे, शिष्यवृत्ती देणे इत्यादी. वरील योजना शासन दरबारी जाहीर होत असल्या तरी प्रत्यक्षात त्या मुलांपर्यंत किती पोहचतात हा एक संशोधनाचाच भाग आहे. आदिवासींच्या मागासलेपणाचा गैरफायदा घेऊन अशा प्रकारच्या योजनांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे मूळ आदिवासी या योजनांपासून वंचित राहिला आहे.

महाराष्ट्र राज्यांत डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन १९७२–७३ पासून आश्रम शाळा सुरू करण्यात आल्या इयत्ता दहावीपर्यंत मुला–मुलींना मोफत शिक्षण व निवास, भोजनासह सर्व शैक्षणिक साहित्य मोफत पुरविण्यात आले. वास्तविक पाहता आश्रमशाळा आणि वसतिगृहे हे आदिवासींच्या विकासाला एक प्रकारे वरदान ठरलेले आहेत. आज जे आदिवासी बांधव नोकरीमध्ये आहेत त्यात बराच वाटा हा आश्रमशाळा आणि वसतिगृहे यांचा आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी आणि बहुतांशी तालुक्याच्या ठिकाणी शासकीय वसतिगृहे निर्माण केल्याने आदिवासी युवक उच्च शिक्षण घेऊ शकला ही जमेची बाजू आहे. परंतु अलीकडे वाढता भ्रष्टाचार आणि अनैतिकता यामुळे आश्रमशाळा आणि वसतिगृहे हे वादाचे विषय झाले आहेत. विशेषतः आश्रम शाळांमध्ये आदिवासी मुलींचे होणारे लैंगिक शोषण, भ्रष्टाचारामुळे आश्रमशाळा व वसतिगृहांना मिळणाऱ्या निकृष्ठ दर्जाच्या सुविधा यामुळे आदिवासी मुलांच्या शिक्षणाला नकळत खीळ बसत आहे. आकडेवारीच्या दृष्टीने विचार केला तर हळूहळू का होईना आदिवासी जमातींच्या साक्षरतेत वाढ झाल्याचे दिसते. १९६१ मध्ये असणारा साक्षरता दर ८.५३ टक्के हा २००१ मध्ये ४७.१० टक्के इतका वाढला ही जमेची बाजू म्हणावी लागेल. तरी ही गती समाधानकारक नाही हे निश्चित. व्यावसायिक अभ्यासक्रम आणि स्पर्धा परीक्षांमध्ये प्रचंड घुसखोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे खऱ्या आदिवासीवर अन्याय झाला आहे. असे असले तरी शैक्षणिक बाबतीत काही प्रमाणात तरी आदिवासी समाज प्रगती करू पाहत आहे हे नाकारता येणार नाही.



### ४. सांस्कृतिक स्थिती–

आदिवासींची संस्कृती ही जागतिक पातळीवरील एक आदर्श संस्कृती आहे. शिल्पकला, चित्रकला, मातीकाम, विणकाम, रंगकाम, लाकूडकाम, बांधकाम, मुखवटे, वेषभूषा, केशभूषा, गोंदणकला, दागिने तयार करणे इत्यादी कला अवगत असलेला आदिवासी हा इतर समाजापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. जागतिक बाजारपेठांमध्ये आदिवासींना निर्माण केलेल्या वस्तुंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आदिवासी आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी नेहमीच सर्वोतोपरी प्रयत्न करीत आला आहे. आपल्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या कलेत दडलेले दिसते. आदिवासींची लोककला, लोकगीते आणि नृत्य हा तर आदिवासींच्या संस्कृतीचा ठेवाच म्हणावा लागेल.

आदिवासी समाज हा मूर्तीपूजा करत नाही. निसर्गातील घटक हेच त्यांचे देव असतात. उदा. पशू, पक्षी, डोंगर, नद्या, सूर्य, चंद्र, धरती यांनाच ते देव मानतात. अनेक ठिकाणी दगडाला शेंदूर फासले की त्या ठिकाणी देवत्त्वाचे रूप प्रकट होते. असे असले तरी त्यांची आपल्या दैवतांवर प्रचंड श्रध्दा असते. देव आहे म्हणून आपले अस्तित्व आहे अशी त्यांची धारणा असते. बहुतेक आदिवासी हिंदू दैवतांना प्रमाण मानतात. कारण पौराणिक काळातील रामायण, महाभारतासारख्या आख्यानांचा त्यांच्यावर प्रभाव पडल्यामुळे राम, श्रीकृष्ण, गणपती, हनुमान, सीता हे त्यांचे देव झाले आहेत. परंतु अलीकडे जसजसा समाज सुशिक्षित झाला तशी त्याला आपल्या अस्तित्त्वाची जाणीव होऊ लागली त्यामुळे पुन्हा आदिवासी समाज आपल्या पूर्व परंपरा जोपासू लागला. निसर्गातील घटक हेच आपले देव मानू लागला.

आदिवासी समाजातील विधी वैशिष्ट्यपूर्ण असतात. मूल जन्माला आल्यानंतर पाचवीचा कार्यक्रम, बाराय, या पारंपरिक विधींना महत्त्वाचे

स्थान असते. महादेव कोळी समाजाचा लग्नविधी तर पूर्वी पाच दिवस चालत असे. त्यामध्ये लोकगीतांना महत्त्वाचे स्थान होते. अलीकडे हा विधी तीन दिवसांवर आला आहे. काही महानगराशी संबंधीत असलेले आदिवासी मंगलकार्यालयामधून लग्नविधी करू लागले आहेत. त्यामुळे नकळत या विधींना जी सांस्कृतिकता आहे ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. उदा. लग्नापूर्वी वधू-वरांची मळी काढणे, जावळ, मांडव डहाळे, देवक, काकणं बाशिंग सोडणे हे विधीप्रसंग त्यामुळे नष्ट होतात की काय अशी भिती व्यक्त होत आहे. आदिवासींच्या सण-उत्सवामधून त्यांची संस्कृती टिकून असल्याचे दिसून येते. उदा. कोरकू जमात- होळी, भवई, गिरोती, सिडोल, कोलाम जमातीत-दसरा, गावबांधणी इत्यादी वैशिट्यपूर्ण सण -उत्सव साजरे करतात. अशा प्रकारे सांस्कृतिकदृष्ट्या आदिवासी समाज हा परिपूर्ण असल्याचे दिसते.

**५.साहित्यिक स्थिती–**

साठोत्तरीच्या काळात दळणवळणाच्या साधनांमध्ये मोठी क्रांती झाली. त्यामुळे आदिवासी समाजात बदल होऊ लागले. इतर समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. अनेक मानव्यशास्त्र संशोधकांचा आदिवासी जीवनावर अभ्यास सुरू झाला. आदिवासी भागात जसजशी शैक्षणिक क्रांती होऊ लागली तशी त्यांच्यात स्वत:ची जाणीव निर्माण झाली. आपल्यावर होणा-या अन्याय, अत्याचाराविरूध्द लेखणी चालू लागली. चळवळीच्या माध्यमातून आदिवासी सजग झाला. निसर्ग हाच त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्यामुळे, तीच त्यांची प्रेरणा बनली. आदिवासी क्रांतीकारकांना आदर्श मानून व फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांतून निर्माण झालेल्या सामाजिक चळवळी आदिवासी साहित्याला प्रेरणा देणा-या ठरल्या.

आदिवासी साहित्याचे लिखित व मौखिक साहित्य असे दोन भाग पडतात. एका पिढीकडून दुस-या पिढीकडे आलेला हा मौखिक वारसा आदिवासी बोलींमुळे समृध्द झाला आहे. लिखित साहित्यापेक्षा या साहित्याला जास्त महत्त्व आहे. आदिवासींनी या लोकसाहित्यातून आपली परंपरा, संस्कृती जोपासली आहे.उदा. लोकगीते, लोककथा, विधिनाटय, म्हणी, उखाणे, कोडी, मंत्र, भगत, पूजारी यांच्या मौखीक प्रकटनातून जो अविष्कार होतो तो अस्सल आदिवासी साहित्य असे म्हटले जाते. या संदर्भात डॉ. विनायक तुमराम यांचे विचार फार महत्त्वाचे वाटतात. ते म्हणतात, 'आदिवासींनी आपले पारंपरिक लोकसाहित्य मौखिक परंपरेने जोपासले आहे. लोकसाहित्याचा हा अमूल्य वाङ्मयीन ठेवा आदिवासींच्या एका पिढीने कळत-नकळत दुस-या पिढीच्या स्वाधीन केला आहे. सपाटून सुरू असलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सुध्दा आदिवासींचे लोकसाहित्य आपला अस्सलपणा अबाधित ठेवून तग धरून राहिले आहे.' आदिवासी लोकसाहित्याच्या संशोधन आणि संकलनामध्ये डॉ.गोविंद गारे यांचे मोठे योगदान आहे. अलीकडे नवशिक्षित तरूण आदिवासी संस्कृतीवर विपुल प्रमाणात संशोधन करू पाहत आहेत.

आदिवासींच्या लिखित साहित्यामध्ये बिगर आदिवासींनीच जास्त लेखन केले आहे. त्याचे कारण असे की ज्या काळात आदिवासी समाज हा अशिक्षित, अज्ञानी होता त्याकाळात आदिवासींच्या संस्कृतीवर,त्यांच्या जीवनावर या साहित्यिकांनी लेखन केले आहे. पुढे जसा आदिवासी समाज साक्षर झाला तसे आदिवासींच्या वेदना, दु:ख, संस्कृती दर्शन आदिवासी स्वत: लिहू लागला. आजही ललित साहित्यामध्ये आदिवासींनी काव्यप्रकारात मोठयाप्रमाणात लेखन केले आहे. नाटक, कथा, आत्मचरित्र, कादंबरी या साहित्यप्रकारात लेखन अभावानेच पहावयास मिळते.

आदिवासी साहित्यात बिगर आदिवासींनी लेखन जास्त केले असले तरी अस्सल आदिवासी बोलीचा बाज आणि आदिवासींच्या जाणीवा-नेणिवांचे मार्मिक विवेचन आदिवासी साहित्यिकांनी केल्याचे दिसते. कारण बिगर आदिवासींनी केवळ निरीक्षण, परीक्षण आणि ऐकीव माहितीच्या आधारे आदिवासी जीवनावर भडक आणि बटबटीत वर्णन केल्याचे दिसते. प्रत्यक्ष अनुभूती, वास्तवता, सामाजिक भान आणि बोलीचा वापर केल्यामुळे आदिवासी लेखकाचे लेखन हे अधिक जिवंत वाटते. थोडक्यात काय तर आदिवासी लेखक हा आपल्या लेखनीतून अधिक प्रभावी विचार मांडू लागला आहे. त्याचे द्योतक म्हणूनच अलीकडे अनेक ठिकाणी आदिवासी



Scanned with CamScanner

साहित्य संमेलने, कवी समेलने भरू लागली आहेत. साहित्याविषयी आदिवासी समाज जागृत झाला आहे. भविष्यात मराठी साहित्याला या साहित्यप्रवाहातून अधिक दर्जेदार लेखन मिळेल अशी अपेक्षा आहे.

६. राजकीय स्थिती–

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागासवर्गीय समाजाचा विकास व्हावा, शासन दरबारी त्यांना प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून घटनेत काही तरतूदी करून ठेवल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची म्हणजे, विधानसभेत आदिवासींसाठी २६ व लोकसभेत ४ जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्याचा उ्देश हाच की, आपल्या लोकप्रतिनिधींमार्फत आपले प्रश्न शासन दरबारी पोहचतील. परंतु भारतातील राजकारण, त्यांचे गट–तट यांमुळे आदिवासींचा विकास झाला का? हा चर्चेचा मुद्दा आहे. पक्षाच्या धोरणापुढे कधी कधी आदिवासींचे लोकप्रतिनिधी आपले मूळ कर्तव्य आणि जबाबदाऱ्या विसरून जातात. त्यामुळे आदिवासी समाज आपल्या लोकप्रतिनिधीवर नाराज होताना दिसतो. मुळात भारत देशात भ्रष्टाचार पराकोटीला पोहचला आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभाग या खात्यात तर आजपर्यंत कोटयावधीचा भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. याचा सर्वात जास्त परिणाम आदिवासी बांधवांवर होतो. आदिवासींचा विकास का होत नाही या पाठीमागे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

आदिवासी विकासासाठी शासनाने नेहमीच सकारात्क भूमिका घेतली आहे. वर्षाला साधारण ४५० कोटींचा निधी शासन मंजूर करते पण खरंच का एका आर्थिक वर्षात एवढी रक्कम आदिवासींसाठी खर्च होते? कितीतरी वेळा आदिवासींचा विकासनिधी पूर्ण खर्च होत नाही. कधी तो परत केला जातो तर कधी तो दुस–याच विकास कामांसाठी वापरला जातो. त्यामुळे आदिवासींचा विकास झपाटयाने होत नाही. मूळातच आदिवासी मतदार हा म्हणावे इतका जागृत नाही. अशिक्षित, अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन कित्येक राजकीय पुढारी अत्यल्प मोबदल्यात आदिवासींची मते विकत घेतात. त्यामुळे आदिवासी हे मागासलेलेच राहिले. त्यामुळे आजही कित्येक डोंगरद–यात राहणा–या आदिवासींपर्यंत रस्ते आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधा पोहचल्या नाहीत. अलीकडे आदिवासी समाज जागृत होत आहे. अन्याय, अत्याचाराविरूध्द तो पेटून उठत आहे. आपल्या लोकप्रतिनिधीला जाब विचारत आहे. हा परिवर्तनाचा चांगला संकेत म्हणावा लागेल. अलीकडे तर स्वतंत्र आदिवासींचा पक्ष असावा अशी चर्चा सुरू आहे. थोडक्यात काय तर राजकारणाविषयी आदिवासी काहीसा जागृत होताना दिसत आहे.

समारोप–

आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य आणि राजकीयदृष्टया विचार केल्यास आदिवासी समाज हा विकासाच्या मार्गावर आहे. असे असले तरी भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्ष झाली तरी आदिवासींच्या विकासाची गती म्हणावी इतकी समाधानकारक दिसत नाही. अजूनही आदिवासी समाज हा महानगरीय विचारापासून दूर आहे. अनेक सोयी, सुविधांअभावी त्यांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसते. शिक्षणाच्या बाबतीत विचार केल्यास जवळपास ५० टक्के आदिवासी हे निरक्षर असल्याचे चित्र दिसते. अज्ञान आणि अंधश्रध्देच्या विळख्यात अडकून पडलेल्या या समाजात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव असल्याचे दिसते. मात्र आपल्या संस्कृतीबाबत तो सदैव जागृत राहिला आहे. त्याचबरोबर शासनाने जाहीर केलेल्या योजना त्यांच्यापर्यंत शंभर टक्के पोहचतात की नाही याची शहानिशा होणे गरजेचे आहे. बोगस, घुसखोरी, भ्रष्टाचार या विघातक प्रवृत्ती नष्ट केल्यास आदिवासींच्या विकासाला गती प्राप्त होईल. अन्यथा हा समाज कायम मागासलेलाच राहील.

निष्कर्ष–

१. डोंगरद–यांत राहत असलेल्या आदिवासींना मालकीची जमीन अत्यल्प असल्यामुळे त्यांना निसर्गावरील घटकांवर आपली उपजिवीका करावी लागते.

२. आर्थिक स्त्रोत कमी असल्यामुळे हा समाज आपली प्रगती करू शकत नाही.




Scanned with CamScanner

३. शिक्षणाबूल उदासिन असलेला हा समाज अज्ञान आणि अंधश्रध्देच्या विळख्यात अडकलेला आहे.
४. कुपोषण, धर्मांतर, बिगर आदिवासींची घुसखोरी, अन्याय, अत्याचार या अनिष्ट प्रवृत्तींमुळे आदिवासींच्या विकासाला खीळ बसला आहे.
५. आदिवासी बोली आणि दुर्गम ठिकाणी असलेली शाळा या समस्यांमुळे आदिवासींच्या शिक्षणात अडथळा निर्माण झाला आहे.
६. शासकीय आश्रम शाळा आणि वसतिगृहे ही आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला वरदान ठरले आहेत.
७. आदिवासींनी आपल्या संस्कृतीचे जतन आजतागायत केले आहे. सुशिक्षित आणि महानगरात वास्तव्यास असलेल्या तरूणांपुढे संस्कृतीचे जतन करण्याचे आव्हान मात्र कायम आहे.
८. आदिवासींचे लोकसाहित्य हे समृध्द असल्यामुळे त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटल्याचे दिसून येते.
९. मूळ आदिवासींपेक्षा बिगर आदिवासी साहित्यिकांनी आदिवासी जीवनावर जास्त लेखन केले आहे. परंतु त्यांच्या लेखनीतून आदिवासींच्या जीवनाचे दर्शन होते पण प्रत्यक्ष अनूभूतीचे चित्रण येत नाही.
१०. शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे अलीकडे आदिवासी लेखक आपल्या संस्कृतीवर, अन्याय, अत्याचारांविरूध्द निर्भिडपणे लिहू लागले आहेत.
११. अज्ञान, अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन राजकीय पुढारी आदिवासींची फसवणूक करताना दिसतात.
१२. आदिवासींचा विकासनिधीचा योग्य वापर न करणे, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार यांमुळे आदिवासींचा विकास जलद गतीने होत नाही.

संदर्भ–

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड–१८, भाग २, पृ. ३८८.
२. कोंडेकर ए.वाय. पाटील मंगला, 'आदिवासींचे समाजशास्त्र,' फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. २००५.
३. डॉ.प्रमोद मुनघाटे (सं.), 'आदिवासी मराठी साहित्यः स्वरूप आणि समस्या,' प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०. प्र. आ. २००७.
४. डॉ. विनायक तुमराम, 'आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा,' विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९८४.
५. देशमूख भौमिक, 'आदिवासी विकास' प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, प्रथम आवृत्ती, २०११




०७०

Scanned with CamScanner